

"अब की बार 100 पार" - शंकर जगताप

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 24/11/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 275 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# "रेकॉर्ड ब्रेक" गर्दीत रिव्हर सायक्लोथॉन

## इंद्रायणी नदी स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी 51 हजार 300 हून अधिक सायकलपटू सहभागी

## आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतील उपक्रमला पिंपरी-चिंचवडकरांचा तुफान प्रतिसाद





"इंद्रायणी ही आपल्या संस्कृतीची जीवनधारा आहे. तिच्या स्वच्छतेसाठी मतभेद विसरुन सर्वांनी एकत्र येणं ही काळाची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला मान्यता दिली. हे या उपक्रमाचे यश आहे. 79 हजारांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून नदी संवर्धनाचा लढा अधिक बळकट होईल. तमाम पिंपरी-चिंचवडकर, सोसायटी फेडरेशन आणि विविध स्वंयसेवी-संघटनांच्या सहभागामुळे ही विश्वविक्रमी सायक्लोथॉन यशस्वी होत आहे. यावर्षीची सायक्लोथॉन 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला समर्पित केली आहे. हजारो सायकलपटूंनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच स्मारकाला मानवंदना दिली. स्मारकाच्या उभारणीसाठी आम्हाला संघर्ष करावा लागला, अनेक आरोप झाले. आगामी काळात कोणताही आरोप सहन केला जाणार नाही. शहरासाठी शिव-शंभूंच्या कार्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करतो."

• **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**इंद्रायणी नदी स्वच्छतेचा जागर संदेश देण्यासाठी रविवारी आयोजित करण्यात आलेल्या 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' या भव्य उपक्रमाला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. वारकरी परंपरा आणि पर्यावरणसंवर्धनाचा संगम घडवणाऱ्या या उपक्रमात 'शिव-शंभू यशोगाथा' हा विशेष कार्यक्रम सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. शिवकालीन शौर्य, सांस्कृतिक वैभव आणि नदी संवर्धनाचा संदेश यांचा अनोखा मेळ यंदाच्या सायक्लोथॉनमध्ये पाहायला मिळाला.**

'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'—धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसरातून रविवार, दि. 23 नोव्हेंबर रोजी पहाटे 6 वाजता सायक्लोथॉनची सुरुवात झाली. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी आयोजित होणाऱ्या या उपक्रमाने यंदा नवा इतिहास रचला. यंदा सायक्लोथॉनचे 9 वे वर्ष होते. रणमर्द शिलेदारांचे संचलन, मर्दानी खेळ, ढोल-ताशांचा गजर आणि मशाल-दिवटी नृत्य यांच्या सादरीकरणांनी शिवराज्यकालीन पराक्रमाची जिवंत झलक उपस्थितांना अनुभवता आली. शिव-शंभू गर्जनेने परिसर दणाणून गेला.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, धनश्री हॉस्पिटलच्या संचालक यांच्यासह विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही ऐतिहासिक सायक्लोथॉन संपन्न झाली. जगातील सर्वात उंच 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' छत्रपती संभाजी महाराजांना मानाचा मुजरा देण्यासाठी हजारोंच्या संख्येने शिवप्रेमी, सायकलपटू व नागरिक आवर्जून हजर होते. 'शिव-शंभू यशोगाथा' हा कार्यक्रम उपक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

## 'एआय काउंटिंग सिस्टम'ने दर्शवला विक्रमी सहभाग

सायक्लोथॉनमध्ये 38 हजार सायकलपटूंनी प्रत्यक्ष ऑनलाईन नोंदणी केली होती. WTE फाउंडेशनद्वारे वापरलेल्या अत्याधुनिक एआय काउंटिंग सिस्टममुळे प्रत्यक्ष उपस्थितीचे आकडे अधिक प्रभावी ठरले. संगणक दृष्टी आणि 'डीप लर्निंग' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्राप्त अहवालानुसार, 51 हजार 300 पेक्षा अधिक सायकली आणि 78 हजार 900 च्या जवळपास नागरिक या उपक्रमाला उपस्थित होते. नोंदणी व्यतिरिक्त बहुसंख्य सायकलपटू सहभागी झाले, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. सायक्लोथॉनच्या आयोजनामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर यांनी सर्वोतोपरी पुढाकार घेतला. पिंपरी-चिंचवड पोलीस यासह विविध शासकीय विभाग आणि शाळा-महाविद्यालयांनी हा उपक्रम यशस्वी केला, त्या सर्वांचे आभार व्यक्त करतो, अशी भावना मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.

## तीन ट्रॅक, हजारोंचा सहभाग...

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सायक्लोथॉनमध्ये 5, 15 आणि 25 किमी अशा तीन ट्रॅकवर हजारोंनी सहभाग नोंदवला. अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे म्हणाले, "शिव-शंभू यशोगाथा ही केवळ सादरीकरणांची मालिका नसून आपला इतिहास आणि संस्कृती जपण्याची प्रेरणा आहे. हीच प्रेरणा निसर्गसंवर्धनाच्या कार्यात अधिक लोकांना जोडेल."



"पिंपरी-चिंचवडमधून पवना, इंद्रायणी आणि मुठा अशा तीन नद्या वाहतात. त्यांचे संवर्धन, जनत आणि सौंदर्यीकरण ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. सायक्लोथॉन हा संयुक्त उपक्रम आहे. याद्वारे नागरिकांनी सायकलचा वापर अधिकाधिक करावा. 'नॉन मोटराईझ व्हेईकल'हा नागरिकांच्या जीवनशैलीचा भाग असावा. सार्वजनिक वाहतूक सुविधांचा वापर करावा. ज्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि शहरासाठी आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल.

पिंपरी-चिंचवड महापालिका अशा उपक्रमांना प्रोत्साहन देत आहे. नदी आणि शहर प्रदूषणमुक्त राहण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

हा देण्यासाठी हा रिव्हर सायक्लोथॉन आयोजित केली जाते. त्याला पिंपरी-चिंचवडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे."

• **श्रावण हर्डिकर,** प्रभारी आयुक्त,पिं.चिं.महापालिका.







दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 24/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 38340 हजार जणांचा एकाच वेळी मतदान करण्याचा निर्धार...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,अविरत श्रमदान, सायकल मित्र, डब्ल्यूटीई फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रिव्हर सायक्लोथॉन २०२५ स्पर्धेमध्ये मतदान जनजागृतीसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन....**



पिंपरी, २३ नोव्हेंबर २०२५ :- पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने आज सुमारे ३८ हजार ३४० जणांनी मतदान करण्याची विक्रमी शपथ घेतली.

मोशी येथील जगातील सर्वात मोठ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' स्मारकाला मानवंदना देण्यासाठी आज पिंपरी चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, डब्ल्यूटीई फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिव्हर सायक्लोथॉन २०२५' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांमध्ये मतदानाबाबत जागृतीसाठी 'मतदान शपथ' देण्याचा विशेष उपक्रम महापालिकेने स्वीप उपक्रमांतर्गत आयोजित केला होता.

यावेळी आमदार महेश लांडगे, विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांच्यासह महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपआयुक्त शिवाजी पवार, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे,उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ.प्रदीप ठेंगल, माजी नगरसदस्य व माजी नगरसदस्या यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवक यांच्यासह तब्बल ३८ हजार स्पर्धक, नागरिक या उपक्रमात सहभागी झाले होते.

### मतदानाची विक्रमी शपथ...

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, " अशी शपथ यावेळी उपस्थितांनी मान्यवरांच्या उपस्थितीत घेतली.जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.

> “ राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आगामी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीकरीता स्वीप उपक्रमांतर्गत स्वीप व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे, त्याचाच एक भाग म्हणून आजचा हा मतदान जनजागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.येत्या निवडणुकीत शहरातील सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा. ”
>
> **श्रावण हर्डीकर** आयुक्त तथा प्रशासक

# श्री.अग्रसेन ट्रस्टची बदनामी करण्याचा प्रयत्न!

## संस्थेची बदनामी करणाऱ्यांवर होणार कायदेशीर कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चिंचवड : श्री अग्रसेन ट्रस्ट चिंचवड प्राधिकरण वतीने एक विशेष नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. या नोटीसीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, दिनांक 18 ऑगस्ट रोजी श्री अग्रसेन ट्रस्ट च्या सर्वसाधारण सभेत एक कार्यकारणी समिती गठीत करण्यात आली. या समितीमध्ये 15 सदस्य नेमण्यात आले. ही समिती 2025 ते 2028 या कालावधीत कार्यरत राहणार आहे.

परंतु 23 नोव्हेंबर रोजी एका हिंदी दैनिकात विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस छापून आली आहे आणि ही नोटीस अग्रसेन ट्रस्टचे पूर्वअध्यक्ष समितीद्वारा देण्यात आली असून ती पूर्णपणे चुकीची आहे. समाजाची दिशाभूल करण्यासाठी संस्थेच्या काही सदस्यांनी राजीनामे दिले आहेत, त्यामुळे




सध्याची कार्यकारणी समिती ही अल्पमतात आली असल्याची ही माहिती पूर्णपणे चुकीची असून समाजात संभ्रम निर्माण करणारी आहे. समितीच्या सदस्यांनी राजीनामा दिला तर हा राजीनामा स्वीकारण्यासाठी कार्यकारणी पदाधिकारी यांना त्याचा अधिकार आहे.

परंतु अशा प्रकारचे कोणतेही राजीनामे आतापर्यंत विद्यमान पदाधिकाऱ्यांकडे आलेले नाही, त्यामुळे हे प्रकरण पूर्णपणे समाजाची दिशाभूल करणारे असल्याचे या नोटिसीमध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच सभा बोलविण्याचे अधिकार संस्थेच्या सचिवांना असते, या सचिवांनी अनेक वेळा सभेची नोटीस काढली. परंतु काही पदाधिकारी या बैठकीला जाणून-बुजून अनुपस्थित राहिले.

त्यामुळे अनुपस्थित पदाधिकारी यांचे नाव कमी करण्याची कारवाई केली गेली व त्यांच्या जागी नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

याबाबतचा चेंज रिपोर्ट सह. धर्मदाय आयुक्त कार्यालय यांच्याकडे पुढील कारवाईसाठी पाठविण्यात आले आहे.परंतु आज हिंदी दैनिकांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नोटीस ही समाजाला दिशाभूल करणारी असून, असे संस्थेची बदनामी करणे बेकायदेशीर आहे.

सभा बोलण्याचा अधिकार हा पूर्णपणे संस्थेच्या सचिवांना असतो, याशिवाय बोलवलेली कोणतीही बैठक किंवा सभा ही बेकायदेशीर असते, त्यामुळे ज्या सदस्यांनी जाणून-बुजून संस्थेची बदनामी करण्याचा प्रयत्न केला आहे, अशा सदस्यांवर कायदेशीर कारवाई करणार असल्याचे या नोटीसीद्वारे श्री अग्रसेन ट्रस्ट चिंचवड वतीने सांगण्यात आले आहे.

# "अब की बार 100 पार" - शंकर जगताप

## थेरगावातील कार्यकर्ता मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या राजकीय जीवनाचा प्रवास 2007 पासून सुरू झाला . त्यानंतर अनेक जबाबदाऱ्या खांद्यावर पडत गेल्या. या जबाबदाऱ्यांना कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळाले. तुम्ही सगळ्यांनी खांद्याला खांदा लावून माझ्यासोबत काम केले. माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात . यामुळे प्रत्येक संघर्षाच्या प्रसंगी खंबीरपणे उभा राहिलो . याच कार्यकर्त्यांच्या बळावर आगामी महापालिका निवडणुकीमध्ये "अब की बार 100 पार" हा नारा आपल्याला पूर्ण करायचा आहे असा निर्धार थेरगाव येथील कार्यकर्ता मेळाव्यात पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी केला. थेरगावच्या याच व्यासपीठावर पुढील वर्षी महापौर, स्थायी समिती अध्यक्ष यांच्याही वर्षपूर्तीचा सोहळा आपण साजरा करू असा संकल्प देखील या निमित्ताने करण्यात आला.**



आमदार शंकर जगताप यांच्या आमदारपदाची वर्षपूर्ती तसेच पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल थेरगाव, कामगार भावन येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व मंडलाध्यक्षांच्या तसेच प्रभागातील सदस्यांच्या वतीने आमदार शंकर जगताप यांना सन्मानित करण्यात आले. मेळाव्याला विधान परिषद आमदार उमा खापरे, अमित गोरखे, पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी खासदार अमर साबळे, माजी महापौर माई ढोरे, भाजपा महिला जिल्हाध्यक्ष सुजाता पालांडे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, तुषार हिंगे, युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव, सचिन साठे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष कुणाल वाव्हळकर, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडेगिरी, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळुराम बारणे, ज्येष्ठ उद्योजक उमेश चांदगुडे तसेच भाजपचे सर्व जिल्हा पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य, मंडळ प्रमुख, मंडल कार्यकारणी सदस्य प्रभाग अध्यक्ष, बुधप्रमुख, सर्व आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक कार्यकर्ते या निमित्ताने उपस्थित होते. कार्यकर्ता मेळाव्याच्या निमित्ताने महापालिका निवडणुकांसाठी मोठे शक्ती प्रदर्शन या निमित्ताने पाहायला मिळाले यावेळी बोलताना आमदार शंकर जगताप यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक केले. या कार्यकर्त्यांच्या जीवावरच आगामी महापालिका निवडणुकीसाठी आपल्याला सामोरे जायचे आहे असे सांगून जगताप म्हणाले, की 2007 ते 2012 या कालावधीत मी सक्रिय राजकारणात सहभाग घेतला. या कालावधीत पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काम केले. मात्र 1992 पासूनच दिवंगत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्यासोबत राजकारणाचे धडे गिरवले आहेत. त्यावेळी पडद्यामागे आम्ही काम करत होतो. लक्ष्मणभाऊ तेव्हा नेहमी म्हणायचे की, " माझे भाऊ कार्यकर्त्यांप्रमाणे काम करतात आणि कार्यकर्ते मला भावासारखे आहे.

'' हे वाक्य माझ्या मनात तेव्हापासून अक्षरशः कोरले गेले आहे. कार्यकर्ते माझे पाठीराखे, अगदी माझ्या भावाप्रमाणे आहेत. त्यांच्या पाठबळावरच आज हा महत्वाच्या टप्पा मी पूर्ण केला आहे. शंकर जगताप पुढे असेही म्हणाले, भारतीय जनता पक्ष हा एकमेव असा पक्ष आहे की जो तुमच्यातील गुणांना, कष्टाला आणि तुमच्या प्रामाणिकतेला नेहमीच दाद देतो. पिंपरी चिंचवड मधील उमा खापरे, अमित गोरखे या कार्यकर्त्यांना आमदार बनवून भाजपने हे सिद्ध केले आहे . तुमच्या सारखे देवदुर्लभ कार्यकर्ते आहेत. त्यामुळे येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीमध्ये आपण 100 सदस्य संख्या नक्की पार करू याची खात्री आहे. असेही जगताप म्हणाले.

### आगामी काळात पाण्याचे नियोजन आणि नदी सुधारवर "फोकस" : आमदार जगताप

यावेळी शंकर जगताप यांनी सांगितले, आमदार म्हणून काम करताना नागपूर हिवाळी अधिवेशनात निळी पूररेषा, अनधिकृत बांधकामांचा प्रश्न उपस्थित करून सरकारला वेळोवेळी नागरिकांच्या बाजूने निर्णय घेण्यास भाग पाडले. आरक्षित जागांवरील ताबेदार नागरिकांना सातबारा व प्रॉपर्टी कार्ड देण्याची मागणी केली. ग्राहक सुविधा ,वीजपुरवठा सुधारणा, सांगवी उपविभाग पुनर्रचनेबाबत आवाज उठवला . आमदार आपल्या दारी हा नागरिकांशी थेट संवादात्मक उपक्रम मी हाती घेतला. या माध्यमातून 13 प्रभागांमधून जवळपास 5 हजाराहून अधिक प्रश्न सोडविले. राज्य व केंद्र सरकारच्या ताब्यातील रस्त्यांच्या कामाबाबत वेळोवेळी आढावा घेतला . हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक समस्या, पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवरील अपघात नियंत्रणावर ठोस उपाययोजनांबाबत मागणी केली आहे. वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत येथील राष्ट्रीय महामार्गावर प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक कोंडीबाबत आढावा बैठक घेतली. महामार्गावर सेवा रस्त्यांची रुंदी वाढवण्यासाठी निविदा मंजूर करून घेतली असून आज सेवारस्त्यांचे काम अंतिम टप्प्यात आहे . प्रस्तावित भक्ति शक्ति ते रावेत, वाकड, भोसरी, मोशी ते चाकण असा मेट्रोचा डीपीआर शासनाला दिला आहे. या कामांमुळे लवकरच वाहतूककोंडीचा प्रश्न कायम मिटेल असा मला विश्वास आहे. याशिवाय आता २०५१ ची लोकसंख्या लक्षात घेऊन मुळशी धरणातून ७६० एम.एल.डी अतिरिक्त पाणी साठा उचलण्याबाबत जलसंपदा मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे. एस.टी. महामंडळासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये नवीन आगार, शहरात विविध ठिकाणी अर्बन स्ट्रीट प्रकल्प उभारायचे आहेत. पवना, मुळा, इंद्रायणी नदी संवर्धनसाठी माझे प्राधान्याने प्रयत्न सुरू आहेत. या तीनही नद्यांचे आरोग्य व्यवस्थित राहावे. यासाठी नदी सुधार प्रकल्प राबवला जात असून यामुळे आगामी काळात चिंचवडचा चेहरा मोहरा बदलणार आहे.

### कार्यकर्त्यांच्या संघटनातून पालिका निवडणूक यशस्वी करू

भारतीय जनता पक्षाने पडद्यामागे काम करणाऱ्या माझ्यासारख्या एका कार्यकर्त्याला विश्वासाने संधी दिली. या संधीचे सोने करण्याचा मी प्रयत्न केला आहे. चिंचवड विधानसभा प्रभारी तसेच शहराध्यक्ष म्हणून काम करताना मी एक लाख 61 हजार सदस्य नोंदणी केली.

जिल्ह्यातील नोंदणीचा हा उच्चांक होता. त्यामुळे पक्षाने पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. हे काम माझ्या एकट्याचे नव्हते. याच्यामध्ये तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांनीच हातभार लावला. आगामी काळात महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे संघटन महत्त्वाचे आहेत या दृष्टीने पुढे काम करायचे आहे. याच संघटनाच्या माध्यमातून पुढील वर्षी महापौर, स्थायी समिती अध्यक्ष यांच्याही वर्षपूर्तीचा सोहळा आपण थेरगाव मधील याच मंचावर साजरा करून असा संकल्पही या कार्यकर्ता मेळाव्यात करण्यात आला.




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734